PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

क्र. संलग्नता/आयसीसी/(२०२५–२६)/०५ /२०२५

**परिपत्रक:**

**विषयः–** अकृषि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन/ पुनर्मुल्यांकन करण्यास मुदतवाढ देणेबाबत...

**संदर्भः–** प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक २२ मे, २०२५ रोजीचे पत्र.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांना अवगत करण्यात येते की, नॅक मुल्यांकन न केल्यामुळे ज्या महाविद्यालयांचे प्रथम वर्षाचे प्रवेश स्थगित करण्यात आले होते, याअनुषंगाने उपरोक्त संदर्भांत नमूद पत्रान्वये प्राप्त निर्देशाप्रमाणे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून खालिल अटीच्या पुर्ततेवर संबंधित महाविद्यालयांचे स्थगित केलेले प्रवेश पूर्ववत सुरू करण्यात येतील.

''महाविद्यालय/संस्था पुढील ६ महिन्याच्या आत नॅक मुल्यांकन/ पुर्नमुल्यांकन करून विद्यापीठास अहवाल सादर करेल. या आशयाचे रू.५००/– च्या स्टॅप पेपरवर हमीपत्र विद्यापीठाच्या महाविद्यालय संलग्नता व विकास विभागाकडे (रूम नं. २०७) **दिनांक २७ मे, २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत जमा करण्यात यावे.''** (रू.५००/– स्टॅप पेपरवरिल हमीपत्र पहिली मेरिटलिस्ट लावण्याआधी सादर करावे. अन्यथा विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित झाले नाहीत तर याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.

पुढे असे ही नमूद करण्यात येते की पुढील ६ महिन्याच्या कालावधीत नॅक मुल्यांकन न केल्यास संबंधित महाविद्यालयांवर विद्यापीठाकडून कडक कारवाई करण्यात येईल.

वरिल बाबींची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**हमीपत्राचा नमूना सोबत जोडला आहे.**

ठिकाण : मुंबई–४०० ०३२
दिनांक : २३ मे, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रतिः–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक.

29/3/2025
156
I/1260419/2025
025/मवि-3/नॅक/मुल्यांकन

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य,
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६
Web:www.dhepune.gov.in ☎ ०२०/२६१२२११९/२६१२६९४० @ : mavi.dhepune@gov.in

क्र. उशिसं-२०२५/मवि-३/नॅक/मुल्यांकन/ई- १९१६८४१ दि. २२ मे २०२५

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,

विषय- अकृषि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :१.शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२०१०/(२०/१०)/विशि-३ दि.०८.१०. २०१०
२.महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० (४)
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे परिपत्रक क्रमांक शैक्ष/संलग्न/पीबीजी/२०२५-२६७३७०-७९ दि.१७ मे, २०२५
४. मुंबई विद्यापीठ, मुंबई यांची सूचना क्रमांक संलग्नता/आय.सी.डी/२०२५-२६/११४, दि.२ मे, २०२५
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांनी दि.२२.०५.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेले निर्देश.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ येथील दि. ८.१०.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित सर्व पात्र महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन व पुनर्मुल्यांकन करणे अनिवार्य असून, त्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे. तसेच वेळोवेळी शासन, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये यांना नॅक मूल्यांकन करून घेण्याबाबत सूचित केलेले आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत सहभाग घेऊन नॅककडून नॅक मूल्यांकन दर्जा प्राप्त करून घेतला असून नॅकच्या विविध सायकल्सच्या (II,III,---Cycle) कालावधीतही नॅक मूल्यांकन करून घेतले आहे. नॅक मूल्यांकन हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे मापदंड असून शैक्षणिक गुणवत्ता व दर्जा धारण करण्यासाठी दर पाच वर्षांनी महाविद्यालयाचे मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, परीक्षा मूल्यमापन, इत्यादीबाबतीत आमुलाग्र बदल होत आहेत. या दृष्टीकोनातून महाविद्यालयांनी नॅक मानांकन/मुल्यांकनाच्या प्रक्रियेतून आपली गुणवत्ता राखणे, गुणवत्ता वाढ करणे अपेक्षित आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, नॅक बंगलोर आणि महाराष्ट्र शासन नॅक मानांकन/मूल्यांकनाबाबत आग्रही आहेत.

४. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ११० मधील पोटकलम ४ नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिती, पुनर्रअधीस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधीस्वीकृतीच्या आवश्यकतांची पुर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही". अशी तरतूद आहे.

तथापि, नॅक बंगलोर या संस्थेकडून फेब्रुवारी, २०२५ च्या निर्देशानुसार एप्रिल २०२५ पासून दुहेरी मानांकन (Binary Accreditation) पद्धती लागू करण्यात आली आहे. ही पद्धती लागू करण्याच्या अनुषंगाने नॅक बंगलोर यांनी उच्च शिक्षण संस्थांसाठीचे लॉगिन पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. यास्तव सद्यस्थितीत नव्याने मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन करण्यासाठीची उच्च शिक्षण संस्था नोंदणी (HEI Registration) तुर्तास कार्यान्वित नसल्याने महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन/पूनर्मूल्यांकनासाठी नोंदणी करता येणे शक्य होत नाही.

५. मा. मंत्री महोदय (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) महाराष्ट्र शासन यांचेकडे दि. २१.०५.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये नॅक बंगलोर यांचे उच्च शिक्षण संस्थांसाठीचे नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकनासाठी संस्था नोंदणी पोर्टल कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले असता, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) महाराष्ट्र शासन यांनी विद्यार्थी हितास्तव नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन करणेकरीता महाविद्यालयांना मुदतवाढ देणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

६. प्रस्तुत बाब विचारात घेता, विद्यापीठांनी नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन न झालेल्या संलग्नित महाविद्यालयांना कारवाईचे निर्देश दिलेले आहेत. अशा महाविद्यालयांमधील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत या विद्यार्थी हितास्तव नॅक बंगलोर या संस्थेकडून नॅक मुल्यांकन / पुनर्मुल्यांकन करणेकरीता ६ महिने पर्यत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५(८१) अन्वये शिथिलता देण्यात येत आहे.

तसेच नॅक बंगलोर यांचेकडून नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन करण्यासाठीचे उच्च शिक्षण संस्था नोंदणी पोर्टल कार्यान्वित होताच नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाबाबतची प्रक्रिया त्वरेने सुरू करण्यात यावी. याबाबत विद्यापीठांनी योग्य प्राधिकरणामार्फत आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच संबंधित महाविद्यालयाकडून आवश्यकतेनुसार लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 22-05-2025 20:05:24
(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १६

प्रत : मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

प्रत : मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव यांना माहितीस्तव सादर.

## UNDERTAKING

(On ₹500 Non-Judicial Stamp Paper – To be submitted by the Principal)

**To,**
The Registrar,
University of Mumbai,
Mumbai – 400098.

**Subject:** Undertaking for Participation in the Admission Process – NAAC Extension Granted Colleges
**Reference:** Government Resolution No. UGC-2025/MAV-3/NAAC/Evaluation I/1260419/2025 dated 22nd May 2025

I, **Prof./Dr. [Full Name]**, Principal of **[College Name]**, affiliated to the University of Mumbai and located at **[College Address]**, do hereby solemnly affirm and declare the following:

1. That our institution has been granted an **extension for NAAC accreditation** as per the above-referenced Government Resolution.
2. That we request participation in the **University of Mumbai admission process** for the academic year **2025–26**, as permitted under the aforementioned GR.
3. That we undertake to **apply for NAAC accreditation** immediately upon reopening of the NAAC application window.
4. That our institution shall **complete the NAAC accreditation process within a period of six (6) months** from the date of reopening of the application window.
5. That upon completion of the NAAC accreditation process, we shall **formally notify and submit proof to the University of Mumbai** without fail.
6. That we understand and agree that **failure to comply** with any of the above conditions shall make our institution **liable for withdrawal from the University admission process** and/or any other action deemed appropriate by the University.

This undertaking is executed in good faith and with full understanding of the responsibilities and consequences involved.

**Date:** [Insert Date]
**Place:** [Insert Place]

**Seal & Signature of Principal**
[Full Name]
Principal,
[College Name]

**Witness 1:**
Name:
Signature:

**Witness 2:**
Name:
Signature: